# बृहन्मुंबई महानगरपालिका

**तातडीचे कामकाज क्रमांक ५.**
महानगरपालिका कार्यालय,
क्रमांक:म.चि./३५०५/मनपा.,
मुंबई, दिनांक:२९ जून २०१९.

संदर्भ :- दि. २५.६.२०१९ चा ज्ञाप क्र. एमसीटी/३९९५.

महानगरपालिकेच्या दिनांक २४ जून २०१९ रोजी भरलेल्या सभेत पुढील ठराव* मंजूर झाला आहे, असे मी आपणांस कळवित आहे :-

महानगरपालिकेचा दिनांक २४ जून २०१९ चा ठराव क्रमांक १६४:-

"संदर्भ:- आयुक्तांचे दि.१६.५.२०१९ चे पत्र क्र. प्रअ/विनि/३६३४१.

''बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत समाविष्ट केलेला तीन क्षेत्रांचा प्रारुप विकास आराखडा (२०३४) चा मसुदा आणि हयामध्ये केलेल्या फेरबदलांची किंवा बदलांची सूची व नकाशा हयांसह नियोजन समितीच्या अहवालास, अद्ययावत सुधारित महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम २८ (४) मधील तरतुदींनुसार, नियोजन समितीच्या अहवालातील फेरबदल क्र. एम १६ मध्ये महानगरपालिकेने सभेत सुचविलेल्या पुढील फेरबदलासापेक्ष, मंजुरी देण्यात यावी :-

'मौजे ओशिवरा येथील न. भू. क्र. ४१०/सी-१ आणि ४४६/सी-२ वर झोपडपट्टी पुर्नवसन योजना मंजूर केली असल्याने, सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस बाधित करणारा, पूर्व-पश्चिम १३.४० मी. रुंद विकास रस्ता पूर्णपणे वगळण्यात यावा व नियोजन समितीने दर्शविलेला ए-बी ९.० मी. रुंद अभिन्यासातील रस्ता पूर्णपणे वगळण्यात यावा.'

''२. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत समाविष्ट केलेला तीन क्षेत्रांचा प्रारुप विकास आराखडा (२०३४) हयावर नियोजन समितीने केलेले फेरबदल किंवा बदल आणि महानगरपालिकेने सभेत सुचविलेला बदल हयांची सूची, उपरोक्त अधिनियमाच्या कलम २८ (४) मधील तरतुदींनुसार, राजपत्रात आणि दोन स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्द करण्यास, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी.

---

★सदर ठराव, महानगरपालिकेने प्रस्तुत सभावृत्तांत कायम करण्यासापेक्ष आहे.

''३. उपरोक्त परिच्छेद १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, तीन क्षेत्रांचा प्रारुप विकास आराखडा (२०३४) हयावर नियोजन समितीने केलेले फेरफार किंवा बदल आणि महानगरपालिकेने सभेत सुचविलेला बदल हयांची सूची हयांसह विकास योजनेच्या मसुद्यास, उपरोक्त अधिनियमाच्या कलम ३० (१) अन्वये आवश्यक असल्यानुसार, राज्य शासनाची मंजुरी मिळविण्यासाठी राज्य शासनाशी पत्रव्यवहार करण्याचे अधिकार, सुचविल्याप्रमाणे, आयुक्तांना देण्यात यावेत.

''४. हया ठरावाची प्रत, सुधार समितीकडे माहितीसाठी पाठविण्यात यावी."

महानगरपालिका चिटणिसांकरिता.

प्रशासकीय अधिकारी (समिति),
महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय.

क्र. एमसीटी / ४९९८
दिनांक २१/०६/१९

प्र. अभि. (वि. नि.)

क्र. एमसीटी / ४९९७
दिनांक ०३/०७/१९

प्रत माहितीसाठी आणि कार्यवाहीसाठी रवाना

प्रशासकीय अधिकारी (समिती)
आयुक्तांचे कार्यालय

3-7-19

बृहन्मुंबई महानगर पालिका
प्रमुख अभियंता (विकास नियोजन)
यांचे कार्यालय
03 JUL 2019
07717
क्र.प्र.अ./वि.नि./

| साधारण | शहर | पूर्व. उप | प. उप |
|---|---|---|---|
| मा. अधि. | टिडीआर | लेखा | आस्था |

EE(DP)H&K

03/07/19

Dy.ch.E(DP)

Chief Engineer (DP)

EE(DP)K/E

D:\anushka\EXTRACT 19\Ectraact -2019 -3.odt